**फेरतपास शपथेवर वादीतर्फे ॲड. बी.बी.क्षीरसागर यांच्यामार्फत सुरु.**

**३.** नरसिंग व धोंडीबा यांच्यातील वाटणी टिपण मी लिहीलेले आहे. तो कागद पाहिल्यास मी ओळखतो. आता मला दाखविलेला दस्त हा मी लिहीलेल्या दस्ताची झेरॉक्स प्रत आहे. दि.०३/०८/१९८२ रोजी तो दस्त मी लिहीला. त्यावर नरसिंगने सही केली आहे व धोंडीबाचा अंगठा आहे. सदर सही व अंगठा माझ्यासमोर झालेला आहे. साक्षीदार म्हणून वकील श्री.के.एस.देशमुख, शंकर मरेवाड व सय्यद अकबर यांनी सहया केलेल्या आहेत. गुरले नावाच्या साक्षीदारांनी अंगठा केलेला आहे. सदर दस्त माझ्यासमोर झाला. तो दस्त पांढ-या कागदावर झाला. त्याची मुळ प्रत कोणाकडे आहे हे मला आठवत नाही. त्यावर दस्तुर म्हणून माझी सही आहे. त्यातील मजकूर पक्षकांराच्या सांगण्याप्रमाणे लिहीला आहे. त्यास **निशाणी ७०** देण्यात येते.

**<u>उलटतपास प्रतिवादींचे विधीज्ञ श्री.डी.एल.घोगरे यांच्यावतीने पुढे सुरु</u>**

**४.** हे खरे की, नरसिंग याला कोर्टाचा अनुभव आहे. हे खरे की, धोंडीबा हा अशिक्षीत होता. हे खरे की, त्याला लिहीता-वाचता येत नव्हते. वाटणीचा दस्त मी कोणाकडे दिला हे मला आठवत नाही. त्यातील माहिती नरसिंग व धोंडीबा यांनी सांगितली. सदर दस्त धोंडीबाच्या घरी लिहीला. तो साधा कागद होता व मी स्वत:च तो घेऊन गेलो. त्याठिकाणी नातेवाईक हजर होते की नाही हे मला आठवत नाही. हे खरे की, मराठवाडयात वाटप करतेवेळी सर्वसाधारणपणे नातेवाईक हजर असतात. दस्तात मोजायच्या फुटामध्ये ज्याच्या त्याच्या नावे दिलेल्या मिळकतीची मोजमापे दिलेली आहेत. ज्याला-त्याला दिलेल्या क्षेत्राच्या चतु:सिमा त्यात लिहील्यात की नाही हे मला आठवत नाही. चतु:सिमा व क्षेत्रफळ दिल्याखेरीज वाटण्याचा दस्त पूर्ण होत नाही असे म्हणता येईल हे खरे आहे. हे खरे की, माझ्यासमोर वाटणी दाखविल्याप्रमाणे मोजणी झालेली नाही. आता मला दाखविलेल्या निशाणी ७० या दस्तात चतु:सिमाचा व क्षेत्रफळांचा उल्लेख नाही हे खरे आहे. हे खरे नाही की, दस्तावर धोंडीबा व

साक्षीदार यांच्या सहया नाहीत. हे खरे की, निरक्षर व्यक्तीचा अंगठा दस्तावर घेतल्यावर तो बांधला जातो. नि.क्रं.७० या दस्तावरील अंगठा बांधला गेलेला नाही. मी सांगतो की, नि.अं असा मजकूर आहे. नरसिंगनेच बनावट वाटणी टिपण केले आहे हे खरे नाही. हे खरे नाही की, नरसिंग व धोंडीबा यांच्यात वाटणी झालेली नाही. नरसिंगच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष देत आहे हे खरे नाही.

**उलटतपास पुर्ण.** **श्रवणोत्तर स्विकृत**

**फेरतपास नाही.** समक्ष

स्वाक्षरीत/-

**( एस.एन.सरडे )**

दिनांक ३०/०१/२०२६. दिवाणी न्यायाधीश व. स्तर,

अहमदपूर.